ISSN 2394- 5303

# printing® Area

Peer Reviewed International Refereed Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

Revised Edition

14) Occupational Stress and Well Being among Contract and Regular Staffs in ...
Dr. Sandeep Kr. Singh, Urvashi, Satyendra S. Chauhan, Dr. Anita Awasthi & Dr. Rajesh Kushwaha, Agra ||74

15) LOAN WAIVER SCHEMES OF STATE GOVERNMENTS: A CRITICAL ANALYSIS
Dr. Shashi Kant Tripathi & Dr. Mukesh Srivastava, Lucknow ||78

16) ग्रामसभेत महिला सहभागाचे महत्व
डॉ. विनोद अजाबराव रायपुरे & प्रा. आशिष सुभाषलाल गुजराथी, चोपडा ||81

17) कागल तालुक्यातील सदाशिवराव मंडलिक कागल तालुका सहकारी साखर कारखाना ...
प्रा. डॉ. श्री. अमृता गणपती मगदूम, जि. कोल्हापूर ||84

18) संयुक्त महाराष्ट्र चळवळ
डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे, नेर परसोपंत ||89

19) अभिलेख ठेवणेच्या पध्दती – एक दृष्टीक्षेप
सीमा किरण होळकर & डॉ. सोमप्रसाद केंजळे, बारामती ||94

20) बहिणाबाईच्या कवितेचा सामाजिक अन्वयार्थ
प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे, जि. बुलडाणा ||98

21) निवडक स्त्रीवादी कवितांचे मराठी साहित्यातील योगदान
डॉ. गुंफा पाटीलबा कोकाटे, बेलापूर ||101

22) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांची प्रासंगिकता आणि शिक्षणमूल्य
प्रा.डॉ. अविनाश कृष्णराव मेश्राम, बुलडाणा ||110

23) पारसी रंगभूमीवर शेक्सपियरचा प्रभाव
डॉ. सतिश पावडे, वर्धा ||113

24) संस्कृत साहित्यातील लोककथेमधील आर्थिक परिस्थितीचे जीवनदर्शन
डॉ. पल्लवी राजनकर ||116

25) दलित साहित्याचा भटक्या, विमुक्तांच्या साहित्यावर पडलेला प्रभाव
प्रा. भारती दि. रत्नपारखी & प्रा. डॉ. सुदर्शन दिवसे, कोरपना ||121

26) मराठी संत साहित्यातील महानुभाव पंथातील सातीग्रंथ
पुरुषोत्तम प्र. सुर्य, जि. वाशिम ||124

www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com

अभिलेखे खराब होणार नाहीत.

अभिलेख कक्षात आद्रता नसावी.

**समारोप** — अभिलेखे हे प्रत्येक विभागाचा महत्वाचा भाग आहेत. अभ्यास केला असता अभिलेख ठेवणेच्या पध्दती थोडया फार प्रमाणात फरक सोडला तर सारख्याच आहेत. ब—याच विभागांची अभिलेख ठेवण्याची पध्दत ए.जी.एच.अँडरसन यांच्या Bravery of Office Procedure and Records आणि ए.बी.सी.डी लिस्ट फॉर द फायलिंग या पुस्तकावर आधारीत आहे. अभिलेख ठेवण्याची पध्दतीत कालानुरूप बदल करणेची गरज आहे. अभिलेखांचे महत्व लक्षात घेता उपरोक्त शिफारसींचा विचार केल्यास त्याचा उपयोग होईल असे संशोधकाला वाटते.

**संदर्भ ग्रंथ:**

ब्रेव्हरी ऑफ ऑफिस प्रोसिजर अन्ड रेकॉर्ड्स बाय एफ. जी. एच. अन्डरसन

The ABCD Lists for the Filing, Preservation or Destruction of Official Records, by F-G-H-Anderson

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख नियम २००७

अभिलेख व्यवस्थापन मार्गदर्शिका, पुराभिलेख संचलनालय, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (अभिलेखांचे वर्गीकरण, परिरक्षण व नाशन) नियम १९६४

❑❑❑

**20**

# बहिणाबाईच्या कवितेचा सामाजिक अन्वयार्थ

**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग.भि.मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगाव
जि. बुलडाणा

**********

मराठी कवितेच्या गतकाळावर सहज दृष्टीक्षेप टाकल्यास आपणास असे जाणवते की, वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने मराठी कविता ही फुलत आली. भरत आली. आणि परिणाम करत आली आहे. वेगळेपण हेच या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. मराठी कविता ही कधी मध्यमवर्गीय पांढरपेषांच्या अंगानं बोलत आली, तर कधीअगदी सर्वसामान्य माणसाच्या भाषेमध्ये बोलत आली. सर्वसामान्य माणसांच्या भाषेमध्ये व्यक्त होत आलेली कविता ही वेगळी होती. नवी होती. तिचा वेगळा अनुभव होता,वेगळी भाषा होती,वेगळा चेहरा होता. अर्थातच वेगळी अभिव्यक्ती होती. या अभिव्यक्तीला त्या त्या काळामध्ये जन्माला आलेल्या कवींनी अगदी समर्थपणे व्यक्त केलेले आहे. त्याचे कारण त्यांची समाजप्रती असणारी बांधीलकी होय. यास परंपरेमध्ये एक महत्वपूर्ण नाव जोडले जाते ते म्हणजेच बहिणाबाई चौधरी यांचे.

बहिणाबाई चौधरी यांचे नाव मराठी साहित्यामध्ये अजरामर झालेले आहे. बहिणाबाई चौधरी या अशिक्षित असल्या तरी, त्यांचे काव्य हे उच्चविद्या विभूषित असणाऱ्या माणसाला विचार करायला भाग पाडते. एवढे सामर्थ्य त्यांच्या कवितेमध्ये आहे. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म हा खानदेशातील आहे. जळगाव जिल्ह्यातील आसोदा या गावी बहिणाबाई चौधरी यांचा जन्म ११ ऑगस्ट १९८० रोजी झाला. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांना वैधव्य प्राप्त झाले. अनपेक्षितपणे त्यांच्या जीवनामध्ये निर्माण झालेली दुःखाची पोकळी ही फार मोठी होती. ही परिस्थिती त्यांच्या विपरीत असली तरी,सुद्धा बहिणाबाई चौधरी या डगमगल्या नाहीत हे सर्वात महत्त्वाचे. निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे बहिणाबाई चौधरी यांनी शरणागती पत्करली नाही, तर

निर्माण झालेल्या एकंदरीतच वातावरणाला त्या मोठ्या खंबीरपणाने सामोरे गेल्या हे विशेष. इथूनच खऱ्या अर्थाने बहिणाबाई चौधरी यांची कविता आकार घ्यायला लागली. हे महत्त्वाचे. त्या अशिक्षित असल्यामुळे त्यांच्या अनेक कविता ह्या काळाच्या ओघांमध्ये नष्ट झाल्यात. परंतु शेष स्वरूपात असणाऱ्या कवितांच्या माध्यमातून ज्या तऱ्हेने बहिणाबाई चौधरी ह्या कवितांच्या रूपाने आपल्यासमोर आल्यात, त्या कवितांनी समाजमन तृप्त झाले आहे,असे म्हणणे फारसे वावगे ठरू नये. बहिणाबाई यांच्या समोर असणारा समाज आणि त्यामधून त्यांना आलेले अनुभव हा त्यांच्या कवितेचा गाभा आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेमधून जाणवणारा समाज हा वेगवेगळ्या स्वरूपाचा वाटत असला तरी, त्यामध्ये स्त्रियांचा एक फार मोठा वर्ग आहे. त्यासोबतच शेतकऱ्यांचा सुद्धा एक फार मोठा वर्ग आहे. या दोन्ही वर्गातील एक साम्य स्थळ बहिणाबाई चौधरी आपल्या कवितेमधून मांडण्याचा प्रयत्न करतात. आणि ही जे साम्य स्थळ आहे, त्याला आपण कष्ट या स्वरूपामध्ये सहज समजून घेऊ शकतो.

आपल्या कुटुंबातील सदस्यांसाठी प्रसंगी आपल्या स्वप्नांना बाजूला ठेवून समर्पणाची भूमिका निभावणारी स्त्री ही बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेचा आस्थेचा विषय होते. आपले कुटुंब हे सुखामध्ये राहायला पाहिजे आनंदामध्ये राहायला पाहिजे ही तिची भावना बहिणाबाईंच्या कवितांमधून व्यक्त झालेली दिसते. दुसऱ्या अर्थाने आपण विचार केला तर, समाजामध्ये जगणाऱ्या स्त्रियांची एक प्रतिनिधी म्हणून बहिणाबाई चौधरी जोरकसपणाने सामोरे आलेल्या दिसून येतात. कुटुंब, घर, समाज आणि शेती असा एक परीघ बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचा दिसून येतो. शेती हा बहिणाबाई चौधरी यांच्या चिंतनाचा विषय आहे. शेतामध्ये राबणारा शेतकरी बहिणाबाई चौधरी यांना विचार करायला भाग पाडतो. निसर्गावर पूर्णपणे अवलंबून असणारा शेतकरी, त्याचे दु:ख, त्याचे दारिद्र्य याने ग्रस्त असणारा, विवंचनाग्रस्त असणारा शेतकरी हा त्यांच्या कवितेमध्ये फारसा दिसून येत नसला तरी, सुद्धा त्याच्या जीवनातील संघर्ष यांच्या कवितेमधून अभिव्यक्त झाल्याशिवाय राहत नाही हे महत्त्वाचे. याचे अनेक दाखले आपणास बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेमधून तपासता येतील. पाहता येतील. देता येतील.

सकारात्मकता हा बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेचा महत्त्वाचा विशेष पाहायला मिळतो. कुठल्याही परिस्थितीमध्ये हतबल व्हायचं नाही. याची जाणीव त्या आपल्या काव्यकृतीच्या माध्यमातून करून देत राहतात. त्यामुळे त्यांच्या कविता ह्या बोलक्या वाटतात. जवळच्या वाटतात

अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर
आधी हाताला चटके तवा मीयते भाकर
ऐका संसार संसार दोन्ही जिवाचा ईचार
देतो दु:खाले होकार अन सुखाले नकार

किंवा

वाटच्या वाटसरा वाट बिकट मोठी
दिवस ढयलारे पाय उचल झट
असो नसो रे तठी तुह्या लोभाची गोट
येवो संकट किती येऊ दे परिचिती काय तुझ्या ललाटी

बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेमध्ये आलेल्या प्रतिमा ह्या सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील हकीकत व्यक्त करतात. सामाजिक परिपोष ज्या अनुभवांच्या माध्यमातून आकार घेतो आणि प्रचंड रूप धारण करतो, त्या सामाजिक परिपोषाची महत्त्वपूर्ण अभीव्यक्ती बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेमधून सहजपणे अवतीर्ण होताना दिसते. निसर्गत: प्रत्येक माणूस हा समान आहे. परंतु त्याच्या आयुष्याला एक विशेष परिमाण तेव्हाच प्राप्त होतो जेव्हा तो आपल्या कष्टाच्या बळावर समाजामध्ये आपले महत्त्वपूर्ण स्थान निर्माण करतो. परावलंबन या गोष्टीला बहिणाबाई चौधरी या पूर्णपणे नाकारतात. आयुष्यामध्ये जर काही सन्मानाचे मिळवायचे असेल तर, कष्टाशिवाय पर्याय नाही याची प्रकर्षाने जाणीव बहिणाबाई चौधरी यांच्या कविता मध्ये दिसून येते. कष्टावर प्रचंड विश्वास असणारी बहिणाबाई साध्या सोप्या उदाहरणांच्या माध्यमातून समाजामध्ये गाफिल जगणाऱ्या लोकांच्या समोर एक फार मोठे उदाहरण ठरतात. त्याचे कारण अल्पावधीतच त्यांना आलेले वैधव्य हे त्याचे महत्त्व उदाहरण आहे. एकीकडे सामाजिक परंपरा, कौटुंबिक आणि मानसिक संघर्ष यातून स्वत:ची एक स्वतंत्र वाट बहिणाबाई निर्माण करतात व समाजासमोर एक नवा आदर्श उभा करतात. याचे जिवंत उदाहरण त्यांची कविता आहे.

लपे करमाची रेखा माह्या कुंकवाच्या खाली
पुशी सनी गेल कुंकू रेखा उघडी पडली
नको नको रे ज्योतिषा नको हात माझा पाहू
माझं दैवं मले कये माझ्या दारी नको येऊ

किंवा

देव गेले देवा घरी आठी ठेयी सनी ठेवा

डोळ्यापुढे दोन लाल रडू नको माझ्या जीवा
नका नका आया बाया नका करा माझी कीव
झालं माझं समाधान आता माझा मले जीव

एकोणीसाव्या शतकाचा उत्तरार्ध ते विसाव्या शतकाचा पूर्वार्ध या कालखंडामध्ये बहिणाबाई चौधरी यांची कविता घडत जाते. पुरुषप्रधान समाजामध्ये स्त्रियांच्या कर्तृत्वाला असणारे महत्त्व इथे अधोरेखित होते. चूल आणि मूल हेच स्त्रियांचे विश्व होते. हे परीघ म्हणजेच स्त्रियांच्या जीवनाची इतीकर्तव्यता होती. याची जाणीव प्रकर्षाने उपरोक्त कडव्यांच्या माध्यमातून होताना दिसून येते. परंतु बहिणाबाईंनी या परिघाच्या पलीकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. इथे समाजाला नकार नाही, तर स्वत:ची क्षमता सिद्ध करण्याची भूमिका आहे. बहिणाबाई समाजाला नाकारत नाहीत, परंतु आपल्या ठिकाणी असणाऱ्या परिश्रमाची स्वत:ला जाणीव करून देण्यापासून त्या परावृत्तही होत नाहीत. आपल्याकडे सहानुभूतीने आणि दयेने पाहणाऱ्या समाजाला स्वत:च्या ठिकाणी असणाऱ्या कर्तृत्वाच्या द्वारे ठणकावून सांगण्याचा प्रयत्न करतात. पती निधनानंतर स्वकर्तृत्वाच्या जोरावर बहिणाबाईंनी आपल्या कुटुंबाचा मुलांचा सांभाळ केला.

माणूस हा निसर्गाचा घटक आहे. त्याचा आणि निसर्गाचा अनादी संबंध आहे. एकार्थाने निसर्ग त्याच्यामधून व्यक्त होत असतो. तरी स्वार्थांदतेने वागणारा माणूस हे निसर्गालाच पडलेले कोडं आहे. माणसाच्या याच गुणवैशिष्ट्यावर बहिणाबाई व्यक्त झाल्या आहेत.

नको लागू जीवा सदा मतलबासाठी
हिरीताचं देणं घेणं नाही पोटासाठी
उभे शेतामधी पीक ऊन वारा खात खात
तरसती कवा जाऊ देवा भुकेल्या पोटात,

किंवा

किती भरला कणगा भरल्याने होतो रीता
हिरीताचं देणंघेणं नाही डाडोरा करिता
गेली देही निंगी सनी नाव रे शेवटी
नको लागू जीवा सदा मतलबासाठी

किंवा

आला सास गेला सास जीवा तुझ रे तंतर
अरे जगणं मरण एका सासाचं अंतर

भरभरून देणारा निसर्ग आणि राखून ठेवणार माणूस हा चि रंतनाचा प्रवास बहिणाबाई उलगडतात. साध्या शब्दांच्या मांडणीतून जीवनाचं मोठं तत्त्वज्ञान बहिणाबाई उलगडून दाखवतात. बहिणाबाईंनी घेतलेल्या अनुभवांमध्ये समग्र समाज बोलका होतो.

टाया वाजवती पानं दंग देवाच्या भजनी
जसे करती कारोन्या होऊ दे रे आबादानी
देव अजब गारोडी,

किंवा

शेतामधी भाऊराया आला पिकं गोंजारत
हात जोडीसन केला धरत्रिले दंडवत

किंवा

माय भिमाई माऊली जशी आंब्याची सावली
आम्हाइले केलं गार सोता उन्हात तावली
लागे पायाले चटके रस्ता तापीसनी लाल
माझ्या माहेराची वाट माले वाटे मखमल
माहेरून ये निरोप सांगे कानामध्ये वारा
माझ्या माहेराच्या खेपा लौकी नदिले विचारा

बहिणाबाईंची कविता ही समग्र समाजमन ढवळून काढते. साधेपणाच्या माध्यमातून ती जीवनाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करते. हे तिचे सामर्थ्यस्थळ आहे. दैनंदिन जीवनामध्ये घडणाऱ्या बारीक सारीक गोष्टी बहिणाबाई टिपतात व अभिव्यक्त होतात. बहिणा बाई अशिक्षित असल्या तरी, समाज नावाच्या शाळेमध्ये त्या घडल्यात आहेत. या शाळेने त्यांना जीवनाचे फार मोठे अनुभव दिले आहेत. फार मोठे मार्गदर्शन केले आहे. हेच वास्तव म्हणजे त्यांची कविता आहे. मराठी कवितेचे दालन समृद्ध करण्यामध्ये बहिणाबाईंच्या कवितेचा फार मोठा वाटा आहे हे आपणास विसरता येणार नाही.

**निष्कर्ष :**

१. बहिणाबाईंची कविता आत्मप्रेरणेतून जन्माला येते.

२. साध्या सोप्या प्रतिमा ह्या बहिणाबाईंची कवितेचे सामर्थ्य आहेत.

३. आयुष्यात निर्माण झालेल्या दु:खाच्या पोकळीतून बहिणाबाईंची कविता घडते.

४. बहिणाबाईंची कविता स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा मोलाचा संदेश देते.

५. कुटुंब, माहेर, समाज, परंपरा, शेती, शेतकरी, निसर्ग या सर्व विषयांना बहिणाबाईंची कविता स्पर्श करते.

**संदर्भ :**

१. बहिणाबाईंची कविता

# Vidyawarta®

Peer Reviewed International Referred Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318






Revised Edition

Editor

Dr.Bapu G.Gholap

13) Assessment of Biocontamination of Jakekur Tank, Osmanabad Dist (M.S.) ...
**Dr. S. D. Kamble, Dist. Osmanabad (M.S)** ||62

14) Present Management Education Scenario: Trends and Challenges
**Dr. F. N. Mahajan** ||64

15) Assessment of Biodiversity in Bassi Wildlife Sanctuary Rajasthan: A ...
**Dr. Jaideep Singh, Jaipur, Rajasthan** ||69

16) Kamala Das's Struggle for Feminine Existentialism in the Modern World
**Margrat K. M. & Pof. DR. D. P. MISHRA, Jaipur** ||75

17) Control Measures in Air pollution
**Dr. Haridas G. Pisal,Dist.:Beed (MAHARASHTRA)** ||80

18) वर्तमानकालीन संदर्भ आणि ढसाळांची कविता
**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे, शेगाव** ||83

19) छत्रपती शिवाजी महाराज खजीना -एक शोध
**अजीज रशिद तडवी, जळगांव (महा) भारत** ||87

20) स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा राजकीय सहभाग, महिला युवा नेतृत्व आणि राजकीय ...
**श्री. विरेंद्र मुरलीधर घरडे, ता.जि. धुळे** ||88

21) जयपाल सिंह मुंडा आणि छोठानागपूर श्रमिक
**इरपतकर पुरुषोत्तम श्यामरावजी, नागपूर** ||92

22) ग्रामीण आणि शहरी क्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अंतर्मुखी...
**डॉ. आर. एल. निकोसे & वृंदा एम. नंदेश्वर, नागपूर (महाराष्ट्र)** ||94

23) सावरकरांची कुसुम आणि बालविधवा दु:स्थितीकथन : एक शोध
**प्राचार्य डॉ. संजय पोहरकर, लाखनी** ||97

24) समीक्षा
**सुरेखा शशिकांत सरपोतदार, मुंबई** ||101

25) भारतातील शिक्षणाचा हक्क : अमंलबजावणीतील समस्या व उपाययोजनांचा अभ्यास
**श्री. चव्हाण अशोक शामराव, पेठ वडगाव** ||105

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

**18**

# वर्तमानकालीन संदर्भ आणि ढसाळांची कविता

**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगाव

***********

भारतीय समाज व्यवस्था आपल्या कक्षेत अगणित विचार प्रवाहांना घेऊन आपल्या गतीनुसार प्रत्येक कालखंडाला त्याचं एक स्वतंत्र अस्तित्व प्रदान करीत पुढे जात राहते.आपण पुढे लुटल्या जात आहोत किंबहुना इतरांच्या नाहीतर स्वत:च्या हातून फेकले जात आहोत याचे भानही त्याच समाजात राहणाऱ्या माणसाला येत नाही. त्याच्या पातळीवर सुरू असणारा संघर्ष एकच असतो आणि तो म्हणजे पोटाचा. भाकरीचा. त्यामुळे त्या सर्वसामान्य माणसाला आपण दुसऱ्याच्या हातात केव्हा काबीज होत गेलो हे समजतही नाही त्याच्या पातळीवरून त्याच्या स्वच्छ एवढ्या टोकदार झालेल्या असतात की सामाजिक पटलावर सुरू असणारा वैचारिक संघर्ष त्याच्या दृष्टिकोनातून विचारात न घेण्यासारखाच असतो. या सामान्य माणसाच्या वागण्याकडे दुर्लक्ष करून आपणही निश्चित पडणे हे समाजातील वाईट अशी लढा देणाऱ्या विचारवंतांना परवडण्यासारखे नसते. त्यामुळे ते सातत्याने त्या बहुसंख्य अभावग्रस्तांचा मानवतेच्या अंगाने विचार करीत असतात. सामान्यांचे शोषण करून त्यांना गुलाम करून आपल्या अस्तित्वाचा डंका भेटणाऱ्या त्या शोषकांना तोंड देण्यासाठी प्रत्येक कालखंडामध्ये एका नव्या विचार आणि जन्म घेतलेला आहे. असतो. त्याचे अनेक दाखले सलग २१ व्या शतकापर्यंत आपणास देता येतील तथागत बुद्धांपासून ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांपर्यंतची ही परंपरा आपणास पाहता येते. या समाजाचा एक घटक म्हणून सर्व सामान्य माणसांना जगता आले पाहिजे. एक माणूस म्हणून त्याला ओळख प्राप्त झाली पाहिजे ही किमान अपेक्षा प्रत्येक काळाची मागणी राहिलेली असते परंतु ती प्रत्येक काळाने मान्य केली अस ठामपणे म्हणता येणार नाही. हा संघर्ष होता प्रस्थापितांचा आणि विस्थापितांचा त्यामुळे ज्यांनी बुद्धीचा तुर याच्या बळावर या समाजाला आपल्या मनाच्या लहरीनुसार वाकविले त्यांनी स्वत:लाच श्रेष्ठ म्हणून घोषित केले ते प्रत्येक क्षेत्रात. त्यातून साहित्याचा प्रांत ही विलग राहू शकला नाही हे विशेष.

मराठी साहित्याच्या घटनेचा विचार करत असताना वेगवेगळे टप्पे डोळ्यासमोर उभे राहतात त्या त्या टप्प्यांवर जीवन जगणारा समाज कोणकोणत्या प्रश्नांना सामोरे जात होता परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने शिक्षणाचे बोट धरणारा माणूस नव्या माणसांची नवी मांडणी साहित्याच्या अंगाने करायला उभा राहिला त्याचा उद्गार हा दलित साहित्याच्या नावाने समाजाच्या अखंडतेसाठी दुमदुमू लागला. त्यातून साहित्याची निर्मिती होऊ लागली दलित साहित्य कथा, कादंबरी, नाटक, स्व कथन आणि कविता इत्यादी प्रकारातून व्यक्त होऊ लागले. पांढरपेशी मराठी साहित्याला हा फार मोठा धक्का होता. साहित्याच्या परिवर्तनाचा विचार घराघरापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न ज्याप्रकारे स्वतंर्त्यांनी केला त्याहीपेक्षा तो प्रयत्न कवितेने केला. या कवितेने काव्याचे पारंपरिक संकेत नाकारले. ती दलित काव्याच्या रूपाने मुक्त श्वास घेऊ लागली स्वातंर्त्योत्तर कालखंडामध्ये स्वातंत्र्य समता आणि बंद होता या विचारत्रींना मोठ्या सन्मानाने कविता मांडू लागली यामध्ये नामदेव ढसाळ दया पवार वामन निंबाळकर केशव मेश्राम त्र्यंबक सपकाळे अर्जुन डांगळे प्रल्हाद चेनवनकर जवी पवार यशवंत मनोहर इत्यादींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून सामाजिक भीषणता मांडण्याचा प्रयत्न केला त्यांच्या या प्रयत्नांमुळे पाळण्यात अगदी निश्चिंत पहुडलेली पारंपरिक मध्यमवर्गीय पांढरपेशी कविता कोषातून बाहेर पडू लागली. कवितेच्या प्रांतातला आंबेडकरी प्रेरणेने अविष्कृत झालेला हा फार मोठा अविष्कार होता. याही पुढे जाऊन नामदेव ढसाळ तर समग्र कवितेची जी स्थिर स्थावर झालेली तिची मूळ बैठकच बदलू लागले. ती समकालाची गरजही होती. ती कविता सहज होती.

नामदेव ढसाळ हे दलित कवितेतीलच नव्हे तर समग्र मराठी कवितेतील एक मानाचे पान ठरतात. कवितांच्या संदर्भात पूर्वापार चालत आलेले रूढ संकेतच ढसाळ यांनी निकाली काढले त्यामध्ये हेतू पुरस्कार हा भाग नव्हता तर भोगलेल्या जीवनाचा व्यापक अवकाश होता त्या अवकाशाची मांडणी त्यांची कविता करू लागली. ज्या समाजाचा एक भाग म्हणून आपण जगतो त्या समाजाने मानवतेच्या पातळीवरून गावकुसाबाहेरचे जीवन स्वीकारावे व एक माणूस म्हणून आम्हालाही जगू द्यावे ही किमान अपेक्षा जो समाज पूर्ण करीत नाही उलट अनन्वित अत्याचारांच्या माध्यमातून मानवतेला नाकारतो शोषण आणि वेदनांच्या डोहात अखंड बुडून जीव गुदमरून टाकतो त्या त्या शोषणाच्या आणि वेदनांच्या विरोधात दलित कविता उभी राहते. ढसाळ उभे राहतात. संविधानावर अपार विश्वास ठेवून त्या शोषकांचे अड्डे उध्वस्त करून सामाजिक न्यायाची व्यवस्था आपल्या विचारांच्या कवितेच्या जोरावर उभी करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न करतात. अर्थात त्यांच्या कवितेतील जी ऊर्जा आहे प्रेरणास्त्रोत आहे तो डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आहे हा विचार घेऊनच दलित कवी समाजातील आपल्या स्थानाला शोधण्याचा प्रयत्न करू लागले ढसाळ ज्या काळात गोलपिठा घेऊन येतात तो काळ विसाव्या शतकाच्या आठव्या दशकाचा आहे. शिक्षणाच्या अस्त्राने नवे भान येऊ लागलेली पिढी काळाचे आपल्या कर्तृत्वाच्या बळावर नवे नामकरण करू लागली नवा समाज उभा करू लागलेली होती आणि कवितेला आहे सर्व नवे होते त्याचे कारण समाजातील तथाकथित साहित्यिकांना एक व्यक्ती म्हणून समाजातील त्या स्तरापर्यंत जाता आले नाही जिथे जगण्यासाठीचा संघर्ष करीत जगणारी माणसे अभावग्रस्त परिस्थिती समोर पराभूतांसारखी जगू पाहत होती त्या वस्तीलाच वैश्विक गतीचा सिद्धांत बनविण्याचा सफल प्रयत्न नामदेव ढसाळ यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून केला गोलपिठा त्याची सुरुवात होती. प्रारंभ होता.

नामदेव ढसाळ यांच्या 'गोलपिठा' या काव्यसंग्रहाने असंख्य विषयांना हात घातला. इमानदारीने गोलपिठा मांडला. आयुष्याचा नवा कॅनव्हास नव्या शब्दांसाठी नव्या सूत्रधारांसाठी अगदी सज्ज होता. आणि त्यावर ढसाळ यांनी विचार पेरायला सुरुवात केली. माझ्या विचारांशी प्रस्थापित समाजातील प्रस्थापित साहित्यिक, कलावंत सहमत असायलाच पाहिजे हा विचार न करता ढसाळांची कविता व्यक्त होऊ लागली. कवितेचा नवा संस्कार नवी परंपरा या कवितेने निर्माण केली.

अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा, शब्द हुंकारले नरकाच्या कोंडवाड्यत किती दिवस राहायचा आम्ही ? श्वास घुसमटत नष्ट चरियेच्या गटारात चढत होतो आम्ही अगदी किड्यसारखे आजपर्यंत लक्तरात गुंडाळलेली आमुची अब्रू गोल पिठावर नागवी नाऱ्यांनो तुमचा ऱ्हास जवळ आलाय मुक्तछंदाच्या संजीवनीने आम्ही जिवंत झालो आहोत.

समाजाला नरकवत करणाऱ्या किंबहुना नरकात समाजाला उभ्या करणाऱ्या अलिखित आणि अनादी परंपरांनी समाजाला आकार देणारा चेहरा, नाव देणारा माणूसच हद्दपार केला आहे. इथे शब्दांचा किंबहुना विचारांचा संघर्ष हा काही मिळविण्यासाठी आहे. जे इथल्या व्यवस्थेच्या ठेकेदारांनी स्वत:च्या अधिकारात राखून ठेवले आहेत ते ते सर्व नव्याने पुनर्जीवित व्हावे. सर्वांना त्याची मालकी मिळावी आणि सर्वांनी बांधिलकीने जगावे ही रास्ता पेक्षा व्यक्त होतेच सोबतच अत्याचारांचा भूतकालीन संदर्भ कवी देतात ढसाळ इथल्या व्यवस्थेच्या हातून घडलेल्या अनन्वित अत्याचाराला विसरत नाहीत आणि ते शक्यही नाही. जीवन जगत असताना आपला भूतालच्या अपेक्षेने निराशेने विज्ञाने विवरतो आहे त्याला अंतकरणाच्या कोपऱ्यातून खेचून अंतकरण स्वच्छ करता येत नाही ही भूतकालीन वेदना वर्तमानात ठणकत राहते हेच ठणक ढसाळांच्या कवितेतून प्रकर्षाने जाणवते अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा ही कविता वेगवेगळ्या प्रतिमांच्या अंगाने व्यक्त होत जाते त्या प्रतिमांना त्याचा म्हणून काही एक अर्थ आहे जसे अंधार सूर्य नरक कोंडवाडा किडा लक्तर मुक्त छंद इत्यादी ढसाळांच्या काव्यातील प्रतिमा ह्या व्यक्त होण्यासाठीची धडपड करीत नाहीत तर त्या सहज प्रस्फूटीत होतात. आपला रोष व्यक्त

होण्यासाठी करण्यासाठी समाजात माणूस म्हणून जन्माला आलेल्या माणसाचा म्हणून एक समाज असतो माणूस म्हणून एक धर्म असतो त्याचे पालन करता यावे ही साधी अपेक्षा असते ही साधी प्रतिक्रिया समाजाच्या मनपटलावर जेव्हा उमटत नाही तेव्हा माणसाच्या डोक्यातून समाज धुसार होत जातो व दुपडी निर्माण होते या दुपडीच्या संवेदनेचे गुन्हेगार ढसाळांची कविता नेमकी ठरते ती भुईमुक्त आहे मानव मुक्तीच्या तुच्छ ध्येयाने गतिमान झालेली कविता वाचकांना विचार करायला लावते समीक्षकांना एकदा पुन्हा कवितेच्या भूमिका तपासायला भाग पाडते शतकान व शतकांच्या कोंडवाड्यच्या तोंडाशी येऊन उजेडाची अभिलाषा बाळगणाऱ्या माणसांना प्रकाशाचे सुबती कधी होतास आले नाही त्या माणसांना डॉ. बाबासाहेबांच्या रूपाने उजेडाचा विचार करायला भाग पाडणारा उजेडाची गाणी म्हणायला प्रवृत्त करणारा प्रज्ञा सूर्य भेटतो आणि गतानुकतीकतेच्या नरकात कितपत पडणारा माणूस जागा होतो आम्हीही माणसे आहोत हे भान जागे होत जाते. ढसाळांची कविता एका वेगळ्या वळणावर अखंड मराठी कवितेला आणून सोडते. नवा चेहरा देते.

ढसाळांची कविता ही थेट भूतकाळाला भिडते तो दाखवणे त्यात वाचकांना रमवणे हा या कवितेचा स्वभाव नाही इतिहासातील सामाजिक व्यंगावर ती भाषे करते त्यासाठी कवितेत वापरल्या गेलेली भाषा कमालीची अर्थप्रवाही आहे कारण ती मुळातून जीवन द्रव्य घेऊन अवतीरण होते पारंपरिक मराठी साहित्याला त्यांच्या शब्दांचे अर्थ उलगडणे कमालीचे जीकीरीच्या वाटत असले तरी त्या शब्दांचे ते नैसर्गिक मूल्य आहे. स्वाभाविक सौंदर्य आहे याच शब्दांमध्ये अभावग्रस्तांचे एक भले मोठे जग नामदेव ढसाळ यांचे कविता सांगू लागते या शब्दांपासून पळणे दूर जाणे म्हणजेच कवितेची आशा अभिव्यक्ती गमावणे होय हे गमावले पण घेऊन जगणे एका सच्चा काव्य रसिकाला चिकित्सकाला परवडण्यासारखे नाही परिणामी ढसाळांची कविता मनापासून स्वीकारली गेली ती जिथे घडते ते तिचे विश्व जग स्वीकारले गेले हे महत्त्वाचे.

मलाही दारिद्र्याचं स्वतंत्र शेत आहे, दैववशात आकार परिवर्तन घडो न घडो मलाही दारिद्र्याचं एक स्वतंत्र शेत आहे, ज्याची वहिवाट करता करता दिवस उगवतात, दिवस मोडतात, अगोदरचे असतील विचार भूदास, नंतरच्या सरंजाम्यांशी हात मिळवणीचे मी टाळले,भौमितिक संसर्गाने वाढली माझी अरण्यगात्रे, भिजले माझ्यातले साम–साव, मी उंद्राचं प्रचंड धड वर पिरॅमिड, मास– मच्छर,भात बैदा, देशी दारू सफेद चाफ्याची फुलं, चुंबनं अलिंगनं, आसनं दागिनं, पलंग गळणारं घर लोटी रिदम, पिळवला गेलेलो मी : माझ्या तन्हाईत.'

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये सर्वसामान्यांची जी अपेक्षा होती ती मूलभूत गरजा पूर्ण होण्याच्या संदर्भातली. त्यासाठी स्वातंत्र्याचा गजर केला गेला राजकीय स्वातंर्त्याच्या अधीन राहून सामाजिक स्वातंत्र्याची मूस बांधली गेली हेतू हाच की सर्वसामान्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न सुटावा. साहित्याच्या ह्या अपेक्षा व्यक्त होऊन अनेक नवं साहित्यिक साहित्याच्या प्रांतात येऊ लागले त्यांचे उद्देश वेगवेगळे होते हे सांगण्याची गरज नाही त्यातील कितींनी पोट तिडकिने भाकरीचा प्रश्न सोडविला आहे की व्यवस्था त्यांचा स्वीकार करते जे स्वत:ला नाकारून इतरांचे अस्तित्व मान्य करीत गेलेत मान्य करीत आहेत नेमका यालाच सुरुंग लावण्याचा प्रयत्न ढसाळानी केला परावलंबन नाकारले दैववाद नाकारला इतरांची गुलाम करणारी सहानुभूती नाकारली. असे असले तरी सामाजिक विध्वंसनाचा विचार त्यांची कविता करीत नाही समाज सर्जन बांधिलकी यांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न ही कविता करते. परंपरेला साजेसे वर्तन परंपरेच्या वाहकांनी करावे ही सुक्तापेक्षा जी प्रस्थापितांची आहे तिच्या ठिकऱ्या उडून समतेचे निशाण फडकविण्याचा प्रयत्न ढसळांची कविता करते नवे गडी नवे राज दैवशाचा माज हद्दपार ही सुचकता कवितेतून स्पष्ट होते आर्थिक विपणनावस्थेमध्ये जगणारा एक समाज समूह बदलासाठीची सुयोग्य संधी शोधतांना दिसतो आता अठरा विश्व दारिद्र्याच्या पखाली वाह्याच्या नाहीत हा उद्गार जुने जमा झाल्याचे संकेत देतो प्रत्येक पिढीला छळणारा दारिद्र्याचा फेरा कवी नाकारतो आणि जोरकस पणाने धिक्कार करतो त्या प्रवृत्तींचा ज्या आजही आपल्या सुरक्षित उषा मधून बाहेर पडू इच्छित नाहीत ढसाळांची कविता ही प्रश्न

उपस्थित करते व त्याचे मूल्य गर्भित असे उत्तरही देते.

मी चोखाळतोय स्थित्यंतराच्या लाटा कालखंडाच्या अग्रावरून नि विचार करतोय तुझ्या ब्रांच च्या पुतळ्यावरून शिटणाऱ्या रानवट नि शहरी पाखरांचा, तसा विचार हा विचार नसतोच मुळी तो असतो परिक्रमेला गिळत सुटलेला बांडगुळ ज्याच्यापासून व्यक्तित्व व्यक्तिमत्त्वाचा उगम होतो नि खुंटते दीर्घ आत्मयात्रा, दीर्घ वसाहती मधून दिवस जातात बाळपणीच्या अंगणात खेळतात तांबूस झिपऱ्या कुत्र्याच्या पिलांबरोबर आणि हुंगतात कैऱ्यांपूर्वीचा मोहर, जो नूतन वर्षाच्या फुलपाखरासारखा उडतो मी प्रकाश पसरवतो जो युनिव्हर्सिटयांचे चिरेबंद ढिले करतो, जो स्वतंत्र ते कडून स्वतंत्र कडेच जातो,असा तू एकुलता एक आमच्या रथाचा सारथी.

समग्र दलित समाजाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी अस्तित्वाची जाणीव करून दिली ती शिक्षणाच्या माध्यमातून हा समाज शिकू लागला विचार करू लागला आपल्या वैश्विक दुखण्याचा शोध घेऊ लागला याला लागलेला शोध हा समाजाच्या साऱ्या लबाड्या जाग्या उजागर करणारा होता शतकानून शतकांचा कोंडलेला प्रकाश खोपटा–खोपटाच्या खिळखिळ्या झालेल्या दरवाजापर्यंत नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. तुझ्या आधी आणि नंतरही तुझ्यासारखा कोणी नाही हे भकास वास्तव ढसाळ यांची कविता व्यक्त करते. ढसाळांची संवेदन शैली अभ्यासकाला निश्चितच अंतर्मुख करते.

माणसाने पहिल्या प्रथम स्वत:ला पूर्ण अंशाने उद्धवस्त करून घ्यावे, बिनधास्त डिंगडांग धतींग करावी, चरस गांजा ओढावा मुबलक कंट्री प्यावी, याला त्याला कुणालाही आया बहिणी वरून गाली द्यावी, धरून पिदवावे, माणसाने जवळ रामपुरी बाळगावा, रक्त प्यावे,उल्ली सल्लीबोटी खावी, चरबी वितळून प्यावी, टीकाकारांचे गुडसे ठोकावेत हमनदस्ती पाट्यावर, हे सारे सारे विश्वव्यापू गळूप्रमाणे फुगू द्यावे, रिचू द्यावे,नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लुटू नये काळा गोरा म्हणूनये, तू ब्राह्मण तू क्षत्रिय तू वैश्य तू शुद्ध असे हीनऊ नये, आयभैन ओळखण्याचा गुन्हा करू नये, चंद्र सूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे.

पराकोटीचे विकार आणि ठणकत असणाऱ्या समाजाला त्याच्या विकार व शेतीला पराकोटीचा लाभ लाभावा. त्या विकारांनी परिसिमा गाठावी असे वातावरण असे हलाहल समाजाने पचवावे धर्मग्लानीच्या ठणकेने विव्हळणाऱ्याला होऊ द्यावे पूर्ण रिक्त आणि मोडू द्यावे विषाणू सर्वांगात समाजाच्या. त्याचेताजे रक्त येईपर्यंत तोपर्यंत भविष्याने पहावी वाट शांतत्रयस्थाप्रमाणे मग घ्यावा नवा श्वास मानवतेला ओळखण्याचा. होऊ द्यावेत झरे माणुसकीचे उगू द्यावे पीक समतेचे वाजू द्यावा डंका माणसाचा त्याच्या म्हणून स्वीकारलेल्या अस्तित्वाचा प्रारंभ आणि शेवट यातील टोकांच्या मध्ये आवेशाने आणि जिव्हाळ्याने उभी राहिलेली कविता अखिल मानवतेचा विचार करते ढसाळांची कविता काळाच्या मर्यादा ओलांडून वर्तमानातही चिकित्सेची जाणीव व्यक्त करते.

**निष्कर्ष :**

१) समग्र वैश्विक परिसर हा ढसाळांच्या कवितेचा विषय होतो.

२) पारंपरिक कवितेचा धिक्कार न करता ही कविता तिला समज देते

३) नवी शैली नवे शब्द नवी अभिव्यक्ती ढसाळ यांच्या कवितेत आहे.

४) शृंगार आला ढसाळांची कविता नाकारते.

५) विध्वंसन ऐवजी विधायकतेचा आग्रह ही कविता धरते.

६) अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या कवितेचं मूळ रसायन आहे.

**संदर्भ :**

१) गोलपिठा – नामदेव ढसाळ –लोकवांग्मय गृह, मुंबई.

२) मराठी वाङ्मयाचा इतिहास – संपा. प्रा. रा.ग.जाधव खंड सातवा, मासाप. पुणे.

३) दलित कवयित्रींची कविता: स्वरूप आणि चिकित्सा –डॉ. जया पाटील पद्मगंध प्रकाशन, पुणे.

४) समकालीन साहित्याच्या संपा. मनोहर जाधव, श्रीकांत देशमुख, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५) समाज आणि साहित्य – डॉ. सदा कऱ्हाडे. लोकवांग्मय गृह, मुंबई.

# Vidyawarta®

Peer Reviewed International Referred Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318



Editor
Dr.Bapu G.Gholap

13) Jkm_rU ^mJhVrc Cf ànW{_H$ emidVrc B`Îmm 5 dr Am {dÚmÏ`m©Zm ewÕcoIZmV `dmre`m ...
**Sm°. Ava. EZ. Tmcao, _moohS>** ||70

14) मुलांचा व्यक्तिमत्व विकास आणि कुटूंबाची भूमिका
**डॉ. संध्या आयस्कर, बीड** ||72

15) नामदेव ढसाळांच्या काव्यातील समूहनिष्ठता व मानवता
**डॉ. अशोक भक्ते, जि. नागपूर** ||74

16) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार
**प्रा. बोंतेवाड नागेश रामलू, वाळूज** ||79

17) अर्थव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान
**डॉ. मिलींद रा. जांभुळकर, चंद्रपूर** ||81

18) कुटुंब कविता : वैदर्भी बहिणा
**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे, शेगाव** ||85

19) मराठी वाङ्मयाचे सुवर्णयुग
**डॉ. दादा एकनाथ मरकड, जि. अहमदनगर** ||88

20) यशवंतराव चव्हाण यांची अर्थनिती
**प्रा. डॉ. मुजमुले बी. एस., जि. जालना** ||91

21) मराठी ललितगद्यातील व्यक्तिचित्रे
**प्रा.डॉ. जे. एफ. पाटील, भुसावळ** ||94

22) राजकीय सामाजीकरण - एक विश्लेषणात्मक अभ्यास
**डॉ. संभाजी संतोष पाटील, धुळे** ||98

23) मराठवाड्यातील आदिवासी जमातीचे दारिद्र्य- एक चिकित्सक अभ्यास
**प्रा. सुर्यवंशी ज्ञानेश्वर नारायणराव & डॉ. स्वामी एस. डी., हदगाव** ||103

24) पालीसाहित्यामध्ये दुक्खमुक्तीची संकल्पना
**प्रा. डॉ. मोहन दे. वानखडे, नागपूर** ||108

25) शरद पाटील यांच्या ऐतिहासिक दृष्टिकोनाचा अभ्यास
**प्रा. झांजे बी. जे., जि. बीड** ||113

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com

चारचौघात उठून दिसावे म्हणून पुरुष खर्च करतात. मिळवत्या स्त्रिया सुध्दा समाजाला घाबरत असतात. खरे तर सामाजिक व्यवस्थेच्या अनुषंगाने काही बदल होतात प्रथा परंपरेचे पालन पूर्णत: होत नाही. काही स्त्रिया मात्र मुद्दाम सामाजिक नियमाविरुध्द वर्तन करतात.

**निष्कर्ष :**

अर्थव्यवस्थेत स्त्रियांचे कशा स्वरुपाचे स्थान आहे, याचा आढावा घेतल्यानंतर असे निदर्शनास येते की, समाजात कामकरी स्त्रियांमुळे पुरुषवर्गावर बेकारी कोसळली. स्त्री मुक्तीच्या दृष्टीने विचार केल्यास स्त्रियांसाठी स्वाभीमानी जीवन जगण्यासाठी व स्वावलंबनासाठी रोजगार महत्वाचा आहे. स्त्रियांच्या अर्थव्यवस्थेतील सहभागामुळे सामाजिक परिवर्तन होण्यास मदत झालेली आहे. आज नोकरी करणारी पत्नी मिळाल्यास बरे अशी प्रवश्ती वाढत चाललेली आहे. एवढे मात्र निश्चित खरे की, काही मुठभर स्त्रिया आर्थिक बाजूने मजबूत झालेल्या असल्या तरी त्या सर्व स्त्रियांचे प्रतिनिधीत्व करीत नाही.

**संदर्भ :**


१. भारतीय स्त्री जीवन — गीता साने

२. जागतिकीकरण आणि साहित्य समिक्षा — डॉ.भूषण रामटेके

३. स्त्री प्रश्नांची चर्चा: एकोणीसावे शतक — प्रतिभा रानडे

४. लढा टाकलेल्या स्त्रियांचा — ॲड. निशा शिवूरकर

५. स्त्री पुरुष —छाया दातार

६. परिवर्तन एवं विकास का समाजशास्त्र — जयराम बैरवा

७. समाजशल्य —डॉ. बी.एम.क—हाडे


❑❑❑

**18**

# कुटुंब कविता : वैदर्भी बहिणा


**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगाव


मराठी साहित्याचा विचार करीत असताना, अनेक वांग्मय प्रकारांच्या मुशीतून समाजाच्या अवस्था चित्रित झालेल्या, आपणास पाहायला मिळतात. त्यामध्ये कथा कादंबरी नाट्य चरित्र आत्मचरित्र आणि काव्य इत्यादींचा सर्वांकष वाटा महत्त्वाचा मानला जातो कारण त्यातील प्रत्येक वांग्मय प्रकार एक वेगळी अभिव्यक्ती आणि अनुभूती देण्याचा आपापल्या परीने प्रयत्न करताना दिसून येतो. कालखंड कोणताही असला तरी त्या काळातील समाजामध्ये माणसे जीवन जगत असतात हे निर्विवादच. त्या समाजातील माणसांची चेहरे दुखणे खुणे वेगळे असले तरी मूळ स्वभाविकता सारखेच असते. त्यामुळे या समाजातील माणसांच्या स्वाभाविक अभिव्यक्तीला काळाच्या मर्यादा टाकता येणार नाहीत त्यांच्यावर त्या लागता येणार नाहीत तसे करणे हे अमानुष्यतेची ठरण्याची शक्यता अधिक ठरेल. म्हणून अगदी नैसर्गिक बांध्यानुसार व्यक्ती आपले जीवन जगत असेल तर त्याच्या त्या जगण्याचा केंद्रबिंदू साहित्याला शोधावा लागतो अर्थात प्रतिभावंताला ते काम आपल्या अंगाने फत्ते करायचे असते आणि तो ते प्रामाणिकपणे करतो या शंका नाही.

प्रत्येक काळाचे त्याचे म्हणून काही प्रश्न समस्या आणि सामर्थ्य स्थळ असतात या साऱ्या गोष्टींच्या माध्यमातून तो मानव समूह समाज ओळखला जातो. त्या समस्या ती शक्ती स्थळ त्या समाजाला नाव देतात की तो समाज त्यांना समर्थ बनविण्याचा प्रयत्न करतो हा महत्त्वाचा भाग असतो. असे जरी असले तरी तो समग्र अवकाश आवरतात असणाऱ्या माणसांच्या मेंदूला काबीज करून त्यावर स्वार होतो व त्या सर्व क्रिया प्रतिक्रिया प्रसवतो. त्यांचे हे जे प्रसवणे असते ते सृजन सोहळ्याची नुकतीच पायाभरणी असते प्रारंभ असतो हा प्रारंभ त्या समाजाची नेमकी दिशा निश्चित करण्याचा प्रभावी प्रयत्न करीत असतो. हे काम मोठ्या धाडसाने उत्कटतेने कविता करते अगदी

मर्यादित शब्दांच्या पंक्तीमध्ये अखंड विश्व तोडून धरण्याचे बळ तिच्यामध्ये असते त्यामुळे माणसांच्या काळजापर्यंत शिरते. व त्याला ती घायाळ करते अंतर्मुख करते केशवसुतांनी या कवितेला आकाशातील वीज म्हटले आहे याचा अर्थ आपण तिच्या नादाला कुणी लागू नये असा घ्यायचा का ? तर त्याचे उत्तर नाही असे देता येईल. एक अभ्यासाकीय नात्याने कवितेला समजून घेताना तीव्र संवेदनांच्या अंगाने तिच्या प्रांतात ज्याला जाता येईल, किंबहुना तिला आपल्या एरिया ज्याला आणता येईल त्याला व्यक्त होण्यासाठी उसने अनुभवांची कृत्रिम शब्दांची आणि घोटीव नियमांची गरज पडत नाही. पडणार नाही. तो व्यक्त होईल आपल्या आसपास असणाऱ्या जिवंत माणसांच्या समाजातून. अनेक प्रतिभातांना ही शक्य झाले. कविता इथून तिथून सारखी म्हणता येत नाही. हा शब्द जरी वरपांगी एक वाटत असला तरी, त्याची मारक आणि तारक क्षमता वेगळी असते. कवितेत समाजाचं असतो. त्याशिवाय ती नाहीच. तरीही ती वेगळी अभिव्यक्ती देते. या अभिव्यक्तीच्या वाटेवर उभी राहून तिची वाटेवरी होणारी एक कवयित्री आपणास दिसते. ती म्हणजे वैदर्भी बहिणा रुक्मिणीबाई तुकाराम पाटील या. त्यांच्या कविता सक्षमपणे काव्यप्रांतात महत्त्वाचे स्थान प्राप्त करतात. त्यांचे शब्द हे घरगुती आहेत. त्यांना काल्पनिक श्रृंगाराचा सोस नाही किंबहुना नकलीपणाचे प्रचंड चिड त्यांच्या कवितेला आहे म्हणून त्या साधेपणाने ध्येयाच्या तळापर्यंत पोहोचतात व कवितेशी हितगुज करू लागतात.

रुक्मिणीबाई पाटील यांचा जन्म मलकापूर तालुक्यातील एका लहानशा गावी झोडगा येथे झाला आहे.त्यांनी कोणत्याही शाळेत जाऊन शिक्षण घेतले नाही. परंतु जीवनाचे तत्वज्ञान त्यांना नेमकेपणाने कळले आहे. त्यांचे लग्न बॅरिस्टर टी एस पाटील यांच्याशी झाले. व आपला संसार सुखाचा करण्याचा मूलमंत्र त्यांनी समाजाला दिला. दोघांच्या मध्ये असणारा शैक्षणिक दुरावा पाहता क्षणी जाणवतो. परंतु त्याचा फारसा अडथळा त्यांच्या आयुष्यात आला असे त्यांचे कवितेमधून दिसून येत नाही.इथेच रुक्मिणी बाई यांचे सामर्थ्य जाणवते. रुक्मिणीगाण हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह होय. त्यानंतर शामल कुलकर्णी आणि शुभदा बांबूरकर यांनी या कवितेचे वैदर्भीय बहीणा आहे या नावाने संपादन केले आहे. या संपादित ग्रंथामध्ये रुक्मिणीबाई पाटील यांच्या वेगवेगळ्या विषयावरील ८१ कविता निवडून वाचकांना काव्य स्वादाची एक वेगळीच पर्वणी प्राप्त करून दिली आहे. बहिणाबाई चौधरी आणि रुक्मिणीबाई पाटील यांच्यामध्ये साम्य आढळते ते म्हणजे शिक्षण आणि कवितेच्या माध्यमातून. बहिणाबाईचे काव्यविश्व घराच्या गाभ्यापासून सुरू होते व समाजातील दुःखितांपर्यंत पोहोचते. रुक्मिणी बाईची कविता सुद्धा कुटुंब मूल्य जपत समाज मूल्यांचे जतन करून अभिव्यक्त होते. जोरकस विचार मांडण्यासाठी व्यक्तीला शाळेचा उंबरठा चढावा लागतो,ही समज दोघींनी निकाली काढून, समाज ही सुद्धा एक शाळा आहे आणि ती सुद्धा नवनव्या अनुभवाचे ज्ञान देते. याची जाणीव रुक्मिणी बाईंच्या कविता करून देतात.

महाराष्ट्र संतांची भूमी आहे माणसांनी माणसांसोबत बंधू भावाने वागायला पाहिजे. हा मानवतेचा संदेश आपल्या वाणीतून समाजाला देण्याचा प्रयत्न संतांनी केला आहे. त्यांचे संस्कार रुक्मिणीबाई पाटील यांच्या कवितेवर झालेले दिसून येतात.

सोबत धरा तुम्ही चला संतांबरोबर
देव नारायणाचं क्षेत्र आहे डोईवर
आषाढी कार्तिकीची वाट पाहून किती
येथील संत एका पोथी
संसाराची माया नाही ही खरी
मुखी जपा नित्य पांडुरंग हरी
हातामध्ये विना कपाळी गंध
अभंग म्हणण्याचा तुकोबाला छंद.

अध्यात्माचे भक्तिमय वातावरण घरात असल्यामुळे संतांच्या सहवासाने त्यांच्या नुसत्या नामस्मरणानेही हा भवसागर आपणास कसा तरुण जाता येतो याची जाणीव प्रकर्षाने ही कविता मांडते. समाजाचा स्वभाव लक्षात घेऊन त्यावर नेमका इलाज करण्यासाठी संतांनी प्रसंगी आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष केले. समाजातील दीनदुबळे सुखी झाले पाहिजे हा स्वर त्यांच्या अभंगामधून व्यक्त झालेला आहे विश्वास जिव्हाळा आत्महत्या श्रद्धा या पातळ्यांवरून रुक्मिणीबाई पाटील यांची कविता अविरतपणे चालताना पाहायला मिळते. ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस ही बाराव्या शतकापासून सुरू झालेली परंपरा थेट सतराव्या शतकापर्यंत म्हणजेच तुकोबांजवळ येऊन उभी राहते. याचा उल्लेख या कवितेमध्ये येत जातो

कुटुंब ही संकल्पना व्यक्तित्वाच्या पूर्णत्वाची नेटकी व्यवस्था स्पष्ट करते. ज्या काळात रुक्मिणीबाई

पाटील जगतात आजच्या अर्थाने त्याला जुना काळ असे संबोधता येईल. स्वातंर्त्यपूर्व आणि नव्वदपूर्व असा हा एकूण कालखंड त्यांचे कवितेची स्वभाव रेषा स्पष्ट करतो. अशा काळात कुटुंब प्रमुखाला असलेले महत्त्व त्यांच्या कवितेने अधोरेखित केले आहे. हा कुटुंबप्रमुख पुरुष आहे. त्यामुळे त्याच्या अस्तित्वाची देखभाल करणे ही पारंपारिक जीवन पद्धती मान्य करणारी व्यवस्था कवित्री उभी करतात. या संदर्भातील पतीच्या अंगाने जाणवणारी श्रद्धा, जिव्हाळा, प्रेम त्यांच्याकुटुंब कवितेतून व्यक्त होते. या संग्रहातील बराचसा भाग भावनिक जीवनाच्या स्पंदनांना छायांकित करतो.

सीता बसली वनात करे चिंतन मनात
पतीव्रताबाई झाली प्रसिद्ध जनात
किंवा
अशी ही मुलगी धैरवाण किती
यमाला सांगून जिवंत केले पती
जन्माला येऊन शुद्ध भाव असावे
मुलीने जन्माला येऊन दोन्हीकुळ उद्धरावे
किंवा
पतीच्या राज्यात स्त्री खरच तृप्त होते
समाधानी मन तेच बरोबर येते.

रुक्मिणीबाई यांची कविता सहज समोर येते. या कवितेला व्यक्त होण्यासाठी फारसे श्रम लागत नाहीत. हा या कवितेचा एक भाग झाला. कवितेच्या दुसऱ्या प्रांताचा विचार केल्यास त्रीसमर्पण हा महत्त्वाचा धागा या कवितांमधून गोवल्या गेल्याचे प्रकर्षाने जाणवते. भारतीय पुरुष सत्ता की व्यवस्था आपल्या हिशेबाने आपल्या वर्तमान आणि भविष्याचा मोठ्या चलाखिने किंबहुना स्वार्थाने विचार करीत आलेली आहे. हे निर्विवाद. समाजात पुरुषांना महत्त्वाचे स्थान आहे अर्थात कुटुंब संस्थेतही त्यामुळे आपोआपच त्यांच्या शब्दाचे पालन झाले पाहिजे हा संस्कार बालपणातच बिंबविला जातो. त्यामुळे त्यांच्या पुढे जाण्याची हिंमत ही स्त्री वर्गाकडून होताना फारशी दिसून येत नाही. असे दिसून येत असले तरी, त्यांचा वरचढपणा मानण्याची सक्ती कवितेत नाही, तर मनोभावे त्यांच्या अस्तित्वाचा स्वीकार आहे. रुक्मिणीबाईंना पती परदेशी असल्याने त्यांच्याबद्दलची अतोनात काळजी आहे. तसेच त्यांच्याबद्दलचा त्यांचा ओढा नैसर्गिक स्वरूपात पाहायला मिळतो. त्यामुळे तो आणि ती यातील महत्त्वपूर्ण बांधणी त्यांची कविता करताना दिसते.

संसार संसार तुम्हा सोपा का वाटतो
मूर्ती घडण्याचे वेळी आधी घन हा टाकतो
सर्व म्हणतात आम्हा दुःख नको सुख हवं
जन्मोजन्मी ठेवा देवावरती भाव.

परिवर्तन हा जीवनाचा नियम आहे. जन्माला आलेली कुठलीही अवस्था ही कोलमडणारी असते. खोट्या शब्दांनी तिची भलावन करता येत नाही.अगदी तसेच जीवनातील सुखदुःखाच्या संदर्भात सांगता येईल. संसार म्हणजे सुखाची खाण असे नाही, तर दुःखाची उत्पत्ती हे तिचे सौंदर्य आहे उत्पत्ती शिवाय सौंदर्याची जशी पूर्ती नसते तसेच, संसाराची सुद्धा. तो सोपा नाही. सोपा करण्याची दानत स्वतःमध्ये निर्माण करणे ही त्याच्या सुखाची अभिव्यक्ती असते. याची जाणीव ही कविता करून देते.

आत्मा हा पाटील कुडी घर माहेर
जीव जाता झाली माती नेले नगरा बाहेर
हृदयामध्ये आत्म्यासाठी केले ठाणे
केव्हा जाईल सोडून कळेना कोण जाणे
किंवा
जन्माला येऊन काही सार्थक करा
केव्हा काय होईल नाही नरदेह खरा.

घराचा नारायण करा हा मूलमंत्र मानवी जीवनाचे श्रेष्ठतम मूल्य जपण्याचा प्रयत्न करते. संत गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून समोर बसलेल्या साध्या गोळ्या जणांना सांगतात की,आयुष्यात काही चांगलं करून मरा. मरण तर सर्वांनाच लांबवणार आहे मृत्यू प्रत्येकाला लांब होणार कोणीही त्यातून सुटणार नाही. म्हणून सत्कर्म करून जा. याची प्रकर्षाने आठवण रुक्मिणी बाईंच्या कवितेतून होते. आपण केवळ पोटार्थी असता कामा नये. तर ज्या समाजात आपण आयुष्य संपेपर्यंत असेपर्यंत राहतो, जी उचल आपण करतो, त्याची शतपटीने परतफेड करा ही भावना काव्यामागे आहे. शब्द साधे आहेत. म्हणून त्याचे सौंदर्य खेळून ठेवणारे आहे. जीवनाची क्षणेकता ही कविता सांगते. तसेच कवयित्री या प्राणीमात्रावर दया करा हा महत्त्वाचा संदेश समाजाला देतात एका गाईवर या कवितेतून. नातेबंध ही महत्त्वाची संवेदना त्यांच्या कवितेतून उभी राहते. कुटुंब ही कोणत्याही एका व्यक्तीवरही असणारी व्यवस्था नाही, तर सर्व सदस्यांच्या हातभाराने ती साक्षात होते. कुटुंबातील व्यक्तींचे नातेबंध टिकून ठेवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका त्यांची कविता निभावते.

चोळी बांगडीची आशा जन्मच राहीन

आली ही दिवाळी माहेराकडेच पाहीन
किती दिवस झाले मन माझं उदासलं
येत नाही भाऊ लक्ष तिकडे लागलं
आईच्या उकळ्या नाही समजत कोणाला
लहानाचे मोठे करा किती खाऊ पिऊ घाला
बाळ दुखी आईच्या डोळ्यातून गंगा वाहे
आईसारखी माया जगात कोठे आहे ?

रुक्मिणीबाई पाटील यांच्या कवितेचे विश्व हे बहुतांशी कुटुंब कल्पनेने व्यापलेले आहे. यात वडील, पती, मुलगा,मुलगी, जावई, सून, नात, पत्नी, असा गोतावळा आहे. कवयित्रीच्या वाट्यला आलेल्या माणसांनी भरभरून दिल्याची पावती म्हणजे त्यांच्या कविता आहेत. दुःख आणि निराशा हा आयुष्याचा स्थायीभाव असला तरी त्याला खंबीरतेणे सामोरे जाता येते. हा सकारात्मक भाग त्यांच्या कवितेचा कोपरान कोपरा उजळून टाकतो. संसारात आनंदाने जगण्यासाठी माणसाची त्यातल्या त्यात आपल्या माणसांची साथ आवश्यक असते ही अपेक्षा त्यांची कविता व्यक्त करते. खानदेशातील बहिणाबाई जशा अहिराणीतून लक्षात राहतात. अगदी तशाच विदर्भातील रुक्मिणीबाई वऱ्हाडी बोलीतून स्मरणात राहतात. त्यांचे अनेक बोलीभाषिक शब्द, त्यांच्या अर्थासहित वाचकांच्या मनाचा ताबा घेतात.

**निष्कर्ष :**

१) प्रस्तुत कविता ही स्वातंर्त्यपूर्व काळात घडते.
२) कुटुंब हा या कवितेचा कणा आहे.
३) स्त्रियांचे भाव विश्व मोठ्य कुशलतेने चितारले आहे.
४) वऱ्हाडी बोली आणि प्रमाण भाषेचा चप्पल पणे वापर केलेला आहे.
५) पती बद्दल असणारे अपारनिष्ठा कवितेतून दिसून येते.
६) सामाजिक प्रश्नांकडे या कवितेने लक्ष दिले असते तर, ती आणखी परिणामकारक झाली असती.

**संदर्भ :**

१) रुक्मिणी गान : संपा. प्रा. र. का. कोलते, मे. अरुण मुद्रणालय, मलकापूर.
२) वैदर्भी बहीणा : संपा. शामल कुलकर्णी, शुभदा बांबुरकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाउस, पुणे.
३) ग्राम संस्कृती : आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**19**

# मराठी वाङ्मयाचे सुवर्णयुग

**डॉ. दादा एकनाथ मरकड**
मराठी विभाग प्रमुख,
श्री हरिहरेश्वर कला व विज्ञान महाविद्यालय कोरडगाव,
ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

***********

बाराव्या – तेराव्या शतकापासून मराठी वाङ्मय निर्मितीला सुरवात झाली. प्राचीन कालखंड हा संत-पंत-तंत वाङ्मय निर्मितीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. संतांनी भक्तीबरोबरच समृध्द वाङ्मय निर्मिती केली. पंडिती साहित्य आणि शाहिरी वाङ्मय यांचे संदर्भही याच कालखंडात सापडतात. या वाटचालीत संतसाहित्याचा ठेवा मानवी संस्कृतीला लाभलेला अमूल्य ठेवा आहे. या प्राचीन वाङ्मयाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. मराठी भाषेचे शब्दवैभव, भारतीय संस्कृतीचे आणि जीवन मूल्यांचे दर्शन संत कवितेत घडते. महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांचे भूमी विरत्व आणि वैराग्य येथे हातात हात घालून एकत्र राहिले. महाराष्ट्राच्या मायमराठीला खूप मोठा इतिहास आहे. या इतिहासावर नजर टाकली तर असे दिसते की, महाराष्ट्राचा प्रथम उल्लेख एरणगावी सापडलेल्या इ.स.७८२ च्या स्तंभलेखात सापडतो. वायुपुराणात महाराष्ट्राचा उल्लेख दंडकारण्य असा आहे. तर महाभारताच्या सभापर्वात मनरराष्ट्रफ मत्सपुराणात मनवराष्ट्रफअसा आढळतो. इ.स.२२४ च्या मथेरो महाधम्म रस्सिताफ म महारट्टफ असा उल्लेख आढळतो.

मराठी भाषेचा उत्पत्तीकाल शोधतांना असे आढळते की, इ.स.६८० च्या ताम्रपटात सांब्राज्य, पन्नास, प्रिथिवी असे मराठी शब्द आढळतात. इ.स.६९९ च्या चिकुर्डे येथील ताम्रपटात आचलित, करवुन, करित शब्द आढळतात. इ.स.१०१२ च्या अक्षीच्या शिलालेखात मराठी वाक्य मिश्र स्वरूपात आढळते. इ.स. १११६ च्या श्रवणबेळगोळच्या शिलालेखात कोरलेले म श्री चावुण्डराजे करवियले फहे पहिले लिखीत मराठी वाक्य आढळते. इ.स. ११२८ च्या म राजमतीप्रबोध फ या गुजरात मधील यशच्चंद्र पंडिताच्या